संजीवनी मराठे

# माणिकमोती



BVBK-0402968

बा. वा.
२९६८
३।३।६४

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
ना. क्र. २९६८ दिनांक ३।३।६४
विषय बा. वा. क्र. ........

# माणिकमोती

संजीवनी मराठे

BVBK-0402968

मधुराज पब्लिकेशन प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

# माणिकमोती

प्रकाशिका : सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

© संजीवनी मराठे

प्रकाशन क्रमांक ६२१
ISBN 81-85773-41-6

प्रकाशन दिनांक १ सप्टेंबर १९९३

मुद्रक : श्री. गिरिश जोशी
श्रीपाद ऑफसेट
१९४/ २अ शिवकृपा नवी पेठ.
पुणे ४११ ०३०

टाईपसेटींग : यशोदीप टाईपसेटींग
५९० शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ : श्री. दीपक संकपाळ

आतील चित्रे : श्री. अशोक बोकील

किंमत : रुपये बारा मात्र.

# ओंजळ

*'गोष्टी आवडणाऱ्या*
*बालवाचकांसाठी*
*हे ओंजळभर —*
*माणिकमोती'*

— संजीवनी मराठे

# अनुक्रमणिका


१) माणिकमोती ...................... ५

२) सोना आणि चिमणा ............. १२

३) वाहवा! वाहवा! ................ १८

४) मामाच्या गावाला जाऊ या .......... २४

५) पोपट पाहुणा ..................... ३०

६) प्रेमाची जादू ....................... ३७

७) मी संजू बोलतोय! ............... ४४

# माणिकमोती

२९६८
३१।३।९४

'मोती हवे का मोती? हिरे, माणिक, मोती- घ्यायचे आहे का हो कुणाला? स्वस्त दिलेत. पसाभर धान्य, घडाभर मोती-मोती हवे का मोती?'

गोपी राजवाड्यातले आपले काम आटोपून झपझप् पावले टाकत घराकडे निघाली होती. तिचे लक्ष घराकडे लागले होते, 'पण मोती हवे का मोती?' असे विचारणारा एक आवाज तिला ऐकायला आला. तिने लक्ष लावून ते शब्द ऐकले. 'हिरे-मोती-माणके म्हणजे रत्नेच की- ती पसाभर धान्याच्या बदल्यात मिळणार? हे काही खरं नाही. आपण भलतंच काही तरी ऐकलं असावं', असे म्हणून ती तशीच झपझप् पावले उचलत घरापर्यंत गेली. तिच्या उरात धडधडत होतं. उंबऱ्याशी तिची वाट बघत बसलेल्या दोघा मुलांना तिनं जवळ घेतलं. त्यांचे मुके घेत ती आपल्याशीच पुटपुटली, 'हे माझे माणिकमोती. आणखी काय करायचे आहेत मला? गोपी घरात गेली. पदरात बांधून आणलेला खाऊ तिने मुलांना दिला. उरलेला नवऱ्यासाठी झाकून ठेवला. तिचा नवरा किसन हा एका वाणसामानाच्या दुकानात काम करायचा. दुकान बंद झाल्यावर रात्री तो परत आला. गोपीने त्याला जेवायला वाढले. आपण नुसतीच बसून राहिली. 'काय ग अशी का बसून राहिली आहेस तू. जेवायचं नाही तुला? चल, ताट

वाढून घे आपले. ऐकतेय्स ना?' किसनचे हे शब्द ऐकून ती भानावर आली. तिने ताटात भाजी-भाकरी वाढून घेतली आणि मग वाटेवरल्या रानात तिने ऐकलेले ते शब्द किसनच्या कानावर घातले. काही वेळ कुणालाच काही सुचले नाही. 'तू आता हे विसरून जा. आपली ही मुलं-माणिक आणि मोती- तीच आपली दौलत. झोप आता.' असे म्हणून किसनने अंथरुणावर अंग टाकले.

गोपी राणीसाहेबांची आवडती नोकराणी होती. तिने नीट खावे-प्यावे, चांगले कपडे घालावे आणि आपली कामे मनापासून करावीत, इकडे त्यांचे लक्ष असे. त्या दिवशीदेखील तिने राणीसाहेबांची नीट सेवा-चाकरी केली आणि जरा लवकरच ती परतीच्या वाटेला लागली. रानाचा रस्ता सुरू झाला आणि जरा वेळाने तिच्या कानावर शब्द आले -'मोती हवे का मोती? हिरे-माणिक-मोती. पसाभर धान्याच्या बदल्यात घडाभर माणिक मोती घेऊन जा.' तिला वाटले की हा असा भ्रम दररोज होणार आहे का? ती म्हणाली, 'उगाच काहीच्या बाही बोलू नका. हिरे-मोती एवढे स्वस्त होतीलच कसे? गप्प रहा. मला नीट घरी जाऊ द्या.' ती घरी गेली. दुसऱ्या दिवशी कामावर जाताना मात्र तिने दोन पसे धान्य पुरचुंडीत बांधून ओसरीवरच्या खुंटीला लटकावून ठेवले. दिवसभराचे काम आटोपल्यावर गोपी रानाच्या रस्त्याला लागली. तेच

शब्द तिच्या कानावर आले. तशी ती म्हणाली, ‘हवे आहेत मला तुमचे हिरे-माणिक-मोती. माझी लेकरं मोठी होतील, खूप शिकतील. थोराघरच्या मुलींशी त्यांची लग्नं होतील. ऐकलं का? हवे आहेत मला तुमचे ते हिरे-मोती!’ असे म्हणून लगबग पावले टाकीत ती घरी जाऊन पोहोचली. तिला पाहताच तिची दोन्ही मुले धावतच आली आणि म्हणाली, ‘आई ग, आत येऊन पाहा तरी काय गंमत आहे ती.’ गोपी धडधडत्या काळजाने घरात गेली. समोरच्या भिंतीशी दोन सुरेख घागरी झाकून ठेवल्या होत्या. तिने हळूच जवळ जाऊन एका घागरीचे झाकण उघडून पाहिले. आतमधली रत्ने चमचम करत होती. गोपीने झट्दिशी झाकण लावले आणि त्या दोन्ही घागरींवर आपले एक लुगडे पसरून ठेवले. तिने बाहेर येऊन पाहिले, तो काय खुंटीवर पुरचुंडी नव्हती!

किसन कामावरून घरी आला. मुले जेवून झोपली होती. गोपीने दार नीट लावून घेतले. मग घागरीवर पसरलेले आपले लुगडे बाजूला करून ती किसनला म्हणाली, ‘बघितलं का? हिरे-मोती-माणकं ठेवलेले हे घडे - अगदी खरेखुरे. एकदा पहा तरी!’ किसन जवळ गेला. पहिली घागर उघडली. तिच्यात काठापर्यंत रत्ने भरलेली होती. दुसरी घागर उघडली ती अर्धीच भरलेली आहे, असे त्याला दिसले. काय चमत्कार आहे या दुसऱ्या घागरीत. त्या बेटच्याने पुरेशी माणकं-मोती भरलेलीच नाहीत! आपण

जवळजवळ अर्धी घागर दौलतीला मुकलो आहो. आपली दोन्ही मुलं मोठी व्हायची. व्यापार-उदीम करायची. मग एकाला पैसा कमी पडले तर? छे. छे. हे ठीक नाही झालं. ही दुसरी घागरदेखील भरून ठेवायला हवी.' त्याचे हे वोलणे ऐकून गोपीलासुद्धा हळहळ वाटली. हे असं झालं तरी कसं? कुणी घरी येऊन गेल्याचं पण मुलं वोलली नाहीत आणि मुलं तर दारात बसून राहिली होती. ती किसनला म्हणाली, हे बघा, आपण अगोदर या घागरी परसातल्या मोठ्या आंब्याखाली पुरून टाकू या. मिळालंय ते तरी आपल्याला जपायला हवं.' दोघांनी घरामागच्या परसबागेत त्या घागरी नेल्या. खोल खड्डे करून त्यात नीट पुरून ठेवल्या. या कामाने ती दोघेजण अगदी घामाघूम होऊन गेले. अंथरुणावर पडल्या पडल्या दोघांनीही ठरवून टाकले की, हवे तेवढे कष्ट करायचे पण पैसे मिळवून एकेक दोन-दोन करीत रत्ने आणायची आणि ती दुसरी घागरसुद्धा काठोकाठ भरून टाकायची. आपले आणि आपल्या मुलांचे जन्माचे कल्याण करून टाकायचे. एकदा का घागरी भरल्या की मग सुखात राहायचे. कामधंदा काही करायचा नाही. अगदी राजासारखं थाटामाटात रहायचे. ठरलं!

आणि मग दुसऱ्या दिवसापासून त्यांची पैसे साठवण्याची धडपड सुरू झाली. कर्जाचा मोठा थोरला बोजा डोक्यावर असावाआणि त्याची फेड होण्यासाठी माणसानं आपला

जीव गहाण टाकावा, तसे कष्ट ती दोघं नवरा-बायको करायला लागली. पै-पैसे कसा वाचवायचा याच्यासाठी नाना प्रकारच्या युक्त्या शोधू लागली. एक वेळी कमी जेवायचे, आपली शेतीची कामे आपणच करायची, कपडे फाटेपर्यंत घालत रहायचे, असा प्रकार त्यांनी चालू केला. चार-दोन महिने झाले की दहा-पाच मोती त्यांनी विकत आणून त्या दुसऱ्या घागरीत घालावे. कधी चार-दोन माणके आणावी, पण असे काही ठेवावे तरी घागर मात्र अर्ध्यापेक्षा जास्त भरलेली दिसू नये. याचेदेखील त्या दोघांना नवल वाटायचे आणि त्यांच्या कष्टांचे मान आणखी वाढायचे.

एक दिवस राणीसाहेब गोपीला म्हणाल्या, 'गोपी तुझी तब्येत बरी नाही का? अलीकडे पाहावं तो तू दमलेली दिसतेस. किती वाळली आहेस? कसली काळजी लागली आहे का तुझ्या जिवाला?' गोपी हे ऐकून जरावेळ गप्प बसली. मग म्हणाली, 'राणीसरकार, आम्ही दोघं पैशाच्या काळजीत आहोत. पैसे पुरे म्हणून पडत नाहीत. जरा पगारवाढ करता आली तर- ' असे म्हणून ती पदराने डोळे पुसू लागली. राणीसरकार म्हणाल्या. उगी राहा. मी महाराजांना विचारून पाहीन.'

दुसऱ्या दिवशी गोपी राजवाड्यात गेली. भोजनाची वेळ होण्यापूर्वी तिला महाराजांनी बोलावले. ते म्हणाले, 'गोपी, राणीसरकार तुझ्याबद्दल आम्हाला काहीतरी सांगत

जवळजवळ अर्धी घागर दौलतीला मुकलो आहो. आपली दोन्ही मुलं मोठी व्हायची. व्यापार-उदीम करायची. मग एकाला पैसा कमी पडले तर? छे. छे. हे ठीक नाही झालं. ही दुसरी घागरदेखील भरून ठेवायला हवी.' त्याचे हे बोलणे ऐकून गोपीलासुद्धा हळहळ वाटली. हे असं झालं तरी कसं? कुणी घरी येऊन गेल्याचं पण मुलं बोलली नाहीत आणि मुलं तर दारात बसून राहिली होती. ती किसनला म्हणाली, हे बघा, आपण अगोदर या घागरी परसातल्या मोठ्या आंब्याखाली पुरून टाकू या. मिळालंय ते तरी आपल्याला जपायला हवं.' दोघांनी घरामागच्या परसबागेत त्या घागरी नेल्या. खोल खड्डे करून त्यात नीट पुरून ठेवल्या. या कामाने ती दोघेजण अगदी घामाघूम होऊन गेले. अंथरुणावर पडल्या पडल्या दोघांनीही ठरवून टाकले की, हवे तेवढे कष्ट करायचे पण पैसे मिळवून एकेक दोन-दोन करीत रत्ने आणायची आणि ती दुसरी घागरसुद्धा काठोकाठ भरून टाकायची. आपले आणि आपल्या मुलांचे जन्माचे कल्याण करून टाकायचे. एकदा का घागरी भरल्या की मग सुखात राहायचे. कामधंदा काही करायचा नाही. अगदी राजासारखं थाटामाटात रहायचे. ठरलं!

आणि मग दुसऱ्या दिवसापासून त्यांची पैसे साठवण्याची धडपड सुरू झाली. कर्जाचा मोठा थोरला बोजा डोक्यावर असावाआणि त्याची फेड होण्यासाठी माणसानं आपला

जीव गहाण टाकावा, तसे कष्ट ती दोघं नवरा-वायको करायला लागली. पै-पैसे कसा वाचवायचा याच्यासाठी नाना प्रकारच्या युक्त्या शोधू लागली. एक वेळी कमी जेवायचे, आपली शेतीची कामे आपणच करायची, कपडे फाटेपर्यंत घालत रहायचे, असा प्रकार त्यांनी चालू केला. चार-दोन महिने झाले की दहा-पाच मोती त्यांनी विकत आणून त्या दुसऱ्या घागरीत घालावे. कधी चार-दोन माणके आणावी, पण असे काही ठेवावे तरी घागर मात्र अर्ध्यापेक्षा जास्त भरलेली दिसू नये. याचेदेखील त्या दोघांना नवल वाटायचे आणि त्यांच्या कष्टांचे मान आणखी वाढायचे.

एक दिवस राणीसाहेव गोपीला म्हणाल्या, 'गोपी तुझी तब्येत बरी नाही का? अलीकडे पाहावं तो तू दमलेली दिसतेस. किती वाळली आहेस? कसली काळजी लागली आहे का तुझ्या जिवाला?' गोपी हे ऐकून जरावेळ गप्प बसली. मग म्हणाली, 'राणीसरकार, आम्ही दोघं पैशाच्या काळजीत आहोत. पैसे पुरे म्हणून पडत नाहीत. जरा पगारवाढ करता आली तर- ' असे म्हणून ती पदराने डोळे पुसू लागली. राणीसरकार म्हणाल्या. उगी राहा. मी महाराजांना विचारून पाहीन.'

दुसऱ्या दिवशी गोपी राजवाड्यात गेली. भोजनाची वेळ होण्यापूर्वी तिला महाराजांनी वोलावले. ते म्हणाले, 'गोपी, राणीसरकार तुझ्यावद्दल आम्हाला काहीतरी सांगत

होत्या. तुम्ही दोघंही कमवता. आजपर्यंत तुमच्या तोंडून तक्रार ऐकली नाही. आत्ताच ही काळजी कशाने लागली आहे तुम्हाला?' गोपी खाली मान घालून उभी राहिली. मग महाराज म्हणाले, 'खरंखुरे उत्तर दे गोपी! तुलाही त्या तुळाई चेटकिणीनं धनदौलत हवी का - असं विचारलं आहे का?' गोपीने चमकून महाराजांकडे पाहिले. 'महाराज आपल्यालादेखील असं काहीतरी -' होय! तिला अडवीत महाराज म्हणाले. 'आम्हालाही तिने असं विचारलं होते. पण आम्ही दोन वेळा तिला निक्षून सांगितलं की, आम्हाला असा विनकष्टाचा पैसा नको. आम्ही आमच्या पराक्रमाने हवं ते स्वतःच मिळवून घेऊ. असं दोन-तीनदा सांगितल्यावर तिचं ते नाटक बंद झालं.'

गोपी रडत रडत महाराजांच्या पाया पडत म्हणाली, 'महाराज, आम्ही असेच तिच्या कचाटच्यात सापडलो. तिने पाच-पंचवीस माणिक-मोती कमी दिले. म्हणून ते भरून काढायच्या मागे लागलो. खूप कष्ट उपसले, पोरांसकट आम्ही अर्धपोटी राहिलो ...पण ...पण ती घागर जरासुद्धा भरत नाहीए. काय करावं महाराज, सांगावं आम्हाला. मोठे उपकार होतील आमच्यावर!' तिचे हे बोलणे ऐकून महाराजांनाही वाईट वाटले. ते तिला उठवीत म्हणाले, 'तुम्हाला असा धनलोभ जडावा आणि तुम्ही झुरून झुरून मरावे हाच तर तिचा डाव असणार. हे पहा आता असं कर, रानातल्या वाटेने जाताना तू मोठमोठ्याने सांग आम्हाला

तुमची धनदौलत नको आहे. असं दररोज सांगत जा. मग पहा काय होते ते!' आणि किसनला विचारून गोपीने तसेच केले. ती दोन दिवस तसे म्हणत गेली. तिसऱ्या दिवशी त्या दोघांनी आंब्याच्या झाडाखाली उकरून पाहिले. रत्नांनी भरलेल्या घागरी तिथून नाहीशा झाल्या होत्या. किसन आणि गोपी घरात आले. त्यांच्या जीवावरचे मणामणांचे ओझे जणू एकदम उतरले होते. आपल्या दोन्ही मुलांना कुरवाळीत ती दोघंही म्हणाली, 'देवा परमेश्वरा! तू आम्हाला हे माणिक-मोती दिलेस तेच खरे. त्यांना आम्ही प्रेमाने वाढवू, कामधंदा करायला शिकवू आणि पुरेशी मीठ-भाकर मिळाली की सुखही मिळतं हे त्यांना समजावून देऊ. त्या चेटकिणीच्या आणि लोभमोहाच्या विळख्यातून आमची सुटका झाली ती महाराजांच्या आणि तुझ्या कृपेनेच झाली - देवराया! आता आमचे डोळे उघडले आहेत. असे म्हणून ती दोघेजण विछान्यावर आडवी झाली. फार फार दिवसांनंतर त्यांना अशी गाढ झोप घेता आली! जणू त्यांचा भाग्योदयच झाला!

# सोना आणि चिमण

संजीवनी मराठे

एक होती सोना. पंधरा-सोळा वर्षांची, नाजूक, गोरीगोरी आणि निळ्या डोळ्यांची सोना भारीच गोड दिसायची. तिचे केस सोनेरी आणि कुरळे होते. त्यावर तिने एक झालरीची टोपी घातली होती. लाल रंगाचा झगा आणि पायात लाल रंगाचेच बूट घातले होते. सोनाच्या झग्याला सोनेरी बटने होती, आणि कमरेला एक सोनेरी पट्टा बांधलेला होता. तिच्या कमरेवर एक छोटासा घडा होता. त्या घड्यात दुध भरून सोना ते विकायला नेत असे.

चिमण हा एक तरुण आणि गोड मुलगा होता. डोक्यावर तिरकी टोपी आणि अंगावर कामवाल्याचा ड्रेस घालून ही स्वारी ऐटीत उभी असायची. एक झाडू लावलेला बांबू त्याने हातात धरून खांद्यावर टेकवलेला होता. चिमण झाडूवालाच होता. छताला लागलेली कोळीष्टके काढणे आणि धुराडे स्वच्छ करणे हे त्याचे काम असायचे. त्याच्या गोबऱ्या गालाला केराचे फरपाटे उठलेले त्याला कसे शोभून दिसायचे.

अगबाई! एक सांगायचे राहिलेच की, सोना आणि चिमण हेही काही खरीखुरी माणसे नव्हती, आणि त्यांच्या दोन बाजूंना उभे असलेले ते म्हातारे सरदारसाहेब आणि फाकडे सरसेनापती हे देखील खरेखुरे नव्हते. ती सारी

चिनीमातीची केलेली सुंदर खेळणी होती. एका मोठ्या, जुन्या वाड्याच्या माडीवर खूप जुने सामान ठेवले होते. त्यातल्या एका नक्षीदार कपाटावर ही खेळणी मांडून ठेवलेली होती. कुणास ठाऊक किती वर्षे ती तिथे राहत होती!



सरदारसाहेबांना सोना फार आवडायची. ते तिला आपली मुलगीच मानायचे. कधी कधी असे व्हायचे की सरसेनापती सोनाकडे लोभस दृष्टीने पहायचे आणि सरदारसाहेबांना विचारायचे 'महाराज, आपण ही सोना मला कधी देणार आहात? देणार आहात ना?'

सरदारसाहेब आपली खेळण्यांतली मान डुगडुग हलवत साफ 'नाही' म्हणून सांगायचे. त्यांना तशीच मान हलवता

येत असे पण त्यामुळे सोनाला मात्र खूप आनंद व्हायचा. ती चिमणला म्हणायची 'चिमण हे सरदारसाहेब इथे आहेत, म्हणून तर मी या मेल्या सेनापतीच्या तावडीतून सुटले आहे. बाई ग बाई! हा कसला भयंकर सेनापती आहे! मला तर त्याची खूप भीती वाटते!'

सोनाचे बोलणे ऐकून चिमण खूष होऊन जायचा. त्याला खरे म्हटले तर सोना फार आवडायची. तो म्हणायचा सोनाराणी आपण दोघेजण इथून कुठेतरी दूरदूर जाऊ आणि मज्जेत राहू. एकदा का आपण या वाड्याच्या धुराड्यातून बाहेर पडलो की मग काही विचारू नकोस. मोठे मोठे रस्ते, टोलेजंग इमारती, सुंदर वस्तूंनी खच्चून भरलेली दुकाने, कितीपण थाट असतो शहरामध्ये, तुला कल्पनाच करता यायची नाही!'

सोना आपले निळे डोळे मोठ्ठाले करून त्याच्याकडे पहात राहायची. एकदा ती त्याला म्हणाली देखील चिमण आपण खरंच जायचं का त्या सुंदरशा जगात?'

आणि मग एक दिवस, वडील माणसांचं लक्ष चुकवून ती दोघेजण हळूहळू त्या टेबलाच्या काठावरून घसरत, त्या हॉलमधल्या धुराड्याजवळ गेली. चिमणनं वर पाहिले. थोडीफार कोळीष्टके झाडली आणि सोनाचा हात धरून तो तिला म्हणाला 'वर पहा. या नळीतून आपल्याला चढून जायचंय. तुला धीर करून यायला हवं. कबूल? सोनाने मान हलवली. मनातून मात्र ती अगदी घाबरून

गेली होती. कसेवसे ते दोघे वर चढायला लागले. चढत होते, घसरत होते, पुन्हा चढत होते. शेवटी ते अगदी वर वाडग्याच्या छतावर जाऊन पोचले. चिमणने सोनाला म्हटले, 'सोना, बघ तरी खाली. मी म्हणालो होतो ना - ते सगळे तुला तिथे दिसेल. बघ ना-' पण सोना इतकी दमली होती आणि घाबरली होती - की त्या अगदी खोलखोल दिसणाऱ्या भल्याथोरल्या जगात तिला जावेसेच वाटेना. अगदी चिमण बरोबर असला तरी देखील. ती काकुळतीने म्हणाली - 'चिमण, माझ्याने नाही हे सारे सहन व्हायचे. आपण त्या आपल्या छोट्या जगात परत जाऊ. तिथेच राहू.' असे म्हणून सोना रडायला लागली.

चिमणला वाईट वाटले, पण मन आवरून तो प्रेमळ स्वरात तिला म्हणाला, 'तर मग चल. आपण या धुराड्यातून सावकाश उतरून परत त्या घरी जाऊ. पूस बघ डोळे.' ती दोघेजण कशीबशी धुराड्यातून उतरून त्या हॉलमध्ये परत आली आणि हळूहळू, टेबलावरच्या पानाफुलांच्या आधाराने चढून आपापल्या जागेवर जाऊन उभी राहिली. आजूबाजूला पहातात तो काय - सरदारसाहेब तिथे नव्हतेच - ते आपल्याला शोधायला तर खाली उतरले नसतील? असे वाटून त्या दोघांनी डोकावून खाली पाहिले. खाली गालिचावर सरदारसाहेब पडले होते. त्या बिचाऱ्यांचे ते डुगडुगणारे डोके तुटून बाजूला पडले होते. सोनाने डोळे गच्च मिटून घेतले. उघडून पाहिले तेव्हा तो दुष्ट सरसेनापती खवटपणे

हसत तिच्याकडे पहात होता, तिला म्हणत होता - 'चिमण, चिमण करत होतीस ना? झाली की नाही फजिती अखेर.'

सरसेनापतींचे ते बोलणे आणि हसणे ऐकून सोना अगदी वैतागून गेली पण काहीही बोलली नाही.

दोन-चार दिवसांनी असे झाले की सरदारसाहेबांचे डोके कुणीतरी त्यांच्या शरीराला चिकटवले आणि त्यांना परत त्या नक्षीच्या कपाटावर आणून ठेवले. त्यांच्याकडे पाहून सोनाच्या डोळ्यांत पाणी आले, 'आमच्यामुळे तुम्हाला असा त्रास भोगावा लागला ना? असे काही तरी ती पुटपुटत राहिली. त्या दिवशी संध्याकाळी त्या आडदांड सरसेनापतीच्या मनात काय आले कोण जाणे. आपल्या तलवारीच्या मुठीवर हात ठेवीत त्याने सरदारसाहेबांना विचारले - 'ही सोना तुम्ही मला देणार की नाही, ते एकदा सांगून टाका.' एवढे बोलून त्यांनी सरदारसाहेबांकडे पाहिलें. सरदारसाहेब मख्ख उभे होते. त्यांनी आपली मान मुळीच हलवली नाही. सरसेनापती निराश होऊन चरफडत गप्प बसले. सोना आणि चिमण मात्र सुखावले होते. सरदारसाहेबांची मान लाखेनं घट्ट चिकटवली होती, म्हणूनच त्यांनी मान हलवली नव्हती पण हे सरसेनापतींच्या ध्यानातच आले नव्हते.

एक दिवस मात्र सगळेच संपले. त्या वाड्याच्या नव्या मालकाने वाडा पाडून टाकायचा ठरवला. धुळीच्या आणि दगडविटांच्या प्रचंड ढिगाऱ्यात इतर सामानाबरोबरच

ते खेळण्यांचं कपाटही गाडलं गेलं. गोष्ट जरी खेळण्यांचीच होती, तरी सुद्धा त्यातल्या भावना खऱ्या होत्या. म्हणूनच तर मला ही गोष्ट वारंवार आठवते. सोना आणि चिमण, त्यांचे रक्षणकर्ते सरदारसाहेब आणि तो दुष्ट ' सरसेनापती ही पात्रे डोळ्यांपुढे उभी राहतात. आपल्या आसपास कुठेतरी असेच काहीतरी घडत असते, असे वाटून मन अस्वस्थ होते. ही गोष्ट वाचणाऱ्या वाचकांना देखील असेच वाटत राहील - कुणी सांगावे ? -

# वाहवा! वाहवा!

एका गावात एक कुटुंब राहात असे. 'खाऊन पिऊन सुखी' असं म्हणतात ना तसं ते कुटुंब असायला हवं होतं. पण त्यांना मूलबाळ झालं नव्हतं. हे त्या सर्वांचं दु:ख होतं. मुरारी आणि राधा दोघेही वरकरणी आनंद दाखवत असत. पण मनात कष्टीच असत. राधा देव-पूजेमध्ये आपलं मन रमवायची. सासूसासऱ्यांची सेवा करायची. घरची सगळी कामं आनंदाने पार पाडायची.

अखेर एकदा त्यांच्या ध्यानीमनी असलेली ती घटना घडली. राधा गर्भवती झाली. तिची सर्वांनी खूप हौस-मौज केली. पुरे दिवस भरले आणि राधेला कन्यारत्न झाले. कन्यारत्न हा शब्द सार्थच होता. राधेची कन्या अतिशय सुंदर होती. तिचे आजी-आजोबा म्हणाले, 'ही आमची नात कशी सोन्यासारखी आहे. आपण तिचं नाव 'सोना' असंच ठेवू या.'

सोना मोठी होत होती. रूपाबरोबरच तिच्या अंगच्या गुणांमुळेही सर्व लोकांच्या ती फार आवडीची झाली. हळूहळू तिला गावागावांमधून मागण्या येऊ लागल्या. मुरारीला वाटायचं की श्रीमंत असो की नसो आपल्या सोनाला नवरादेखील तिच्यासारखाच रूपगुणांनी संपन्न असा मिळायला हवा. तेच बरोबर होते. सर्व तरूणांमधून त्याने तीन तरुणांची निवड केली. त्यांना भेटीला बोलावले. आगत स्वागत

झाल्यावर मुरारी त्यांना म्हणाला, 'तुम्ही तिघेही मला आवडला आहात. आता असं करूया मी तुम्हाला एक महिन्याची मुदत देतो. या मुदतीत तुम्ही काही ना काही सत्कार्य करालच. महिनाअखेर तुम्ही पुन्हा आमच्याकडे या. आपण काय सत्कार्य केले ते आमच्या घराच्या सर्वांना पटवून द्या. त्यांना जो तरूण पसंत पडेल त्याला आमची सोना माळ घालील.' ते तिघे तरुण 'बरं' म्हणून परत गेले.

एक महिना उलटला. मुरारीने आपल्या घरच्या सर्व वडिलधाऱ्या मंडळींना बोलावून घेतलं. चांगली बैठक घातली. चहाफराळाचीही तयारी ठेवली. ते तिघे तरुण ठरल्याप्रमाणे येऊन आपल्यासाठी ठेवलेल्या जागांवर बसले. रामा, शामा आणि नामा अशी त्यांची नावे होती. रामाने पहिल्यांदा आपण कोणते सत्कार्य केले ते सर्वांना सांगितले. तो म्हणाला, 'माझे वडील चार-पाच वर्षांपूर्वी देवाघरी गेले. आईने मला शिकवलं. मोठे केले. गेल्या पंधरवड्यामध्ये मी वडिलांच्या जमाखर्चाच्या वह्या पाहायला घेतल्या. दहा वर्षांपूर्वी आमच्या राहात्या घराची दुरुस्ती करण्यासाठी माझ्या वडिलांनी गावातल्या एका भल्या माणसाजवळून पाच हजार रुपये घेतले होते. तो भला माणूस कधीच मरून गेला होता. त्याच्या घरच्या माणसांना या कर्जाबद्दल काहीच माहीत नव्हते. मी त्यांच्या घरी त्यांना वहीमधील नोंद दाखवली आणि आईने सांगितल्याप्रमाणे रक्कम व्याजासकट


त्यांना परत दिली. या माझ्या वागण्यामुळे दोन्हीकडच्या मंडळींची मनं फार आनंदित झाली महाराज !

मंडळींनी 'वाहवा' म्हटले आणि टाळ्या वाजवल्या. त्यानंतर शामराव आपल्या सत्कार्याबद्दल बोलू लागला. तो म्हणाला, 'हातात माझी आवडीची लाठी घेऊन दूरदूर भटकायला जाण्याची मला आवड आहे. एक दिवस असाच मी रानातून भटकत होतो. एकामागून एक किंकाळ्या मला ऐकू लागल्या. त्या दिशेने मी धावत गेलो. एका पोरसवदा तरुणाला काही गुंड लोक मारत होते. त्याचा म्हातारा बाप भीतीने लटलट कापत होता. मी त्या गुंडावर हल्ला केला. फटाफट लाठीचे तडाखे दिले. गुंड लोक तिथून पसार झाल्यावर मी म्हाताऱ्याबापाला आणि त्या मुलाला घरापर्यंत सोबत केली. त्यांनी पुन्हा पुन्हा माझे आभार मानले जवळच्या शिदोरीमधून दोन लाडू काढून मला खायला दिले. ते लाडू मला फार गोड लागले महाराज !'

शामरावाचे हे सांगणे ऐकून पुन्हा वडीलमंडळी 'वाहवा !' म्हणाली आणि सर्वांनी टाळ्या वाजवल्या.

नामदेव उठला आणि आपल्या सत्कार्याबद्दल बोलायला लागला. तो म्हणाला, 'मी जे केलं ते सत्कार्य होतं की नव्हतं याची मला कल्पना नाही. आमच्या गावातल्या एका गुंड तरुणाबद्दल सांगतोय मी. चोरीमारी करणे, तरुण मुलींची छेड काढणे, व्यसनात पैसे घालवणे, याखेरीज त्याला दुसरा धंदाच नव्हता. एकदा मी एका डोंगरावरून

पलीकडे आजोळी जायला निघालो होतो. माथ्यावर पोहोचलो: पाहतो तो काय हा गुंड तरुण अगदी कड्याच्या टोकाजवळच्या खडकावर झोपला होता. झोपेत तो कुशीला वळू पाहात होता. आणखी जरादेखील सरकला असता तर तो दरीतच कोसळला असता. मी त्याच्याजवळ जाऊन हलकेच त्याला जागे केले आणि 'नीट अलीकडे सरकून नीज' असं सांगून आल्यापावली मी पुढे निघालो. तो गुंड उठून पळतच माझ्यामागे आला आणि माझ्या पाया पडत म्हणाला,



'नामदेवा! तुझी शपथ, मी पुन्हा कधी गुंडपणा करणार नाही. तू मला भावासारखा आहेस. यापुढे मी तू सांगशील तसा वागेन. इमानाने कामधंदा करीन.' असे हे माझे सत्कार्य. सहजपणाने घडलेले. आपणाला त्यावद्दल काय म्हणायचं असेल ते म्हणावं.'

नामाच्या या भाषणाला सर्व मंडळींनी कितीदा तरी 'वाहवा! वाहवा!' म्हटले, टाळ्यांचा कडकडाट झाला.

मुरारीने सर्वांना शांत केले. वडील मंडळींपुढे तो हात जोडून म्हणाला, 'या तिघाही तरुणांच्या सत्कार्याबद्दल आपण ऐकले आहे. सर्वांचा विचार घेऊन काय तो निर्णय द्यावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.'

काही वेळ वडील मंडळी एकमेकांत कुजबुजत होती. त्यानंतर मुरारीचे वडील उभे राहून सांगू लागले. ते म्हणाले, 'आम्हाला वाटतं की हे तिघेही तसे चांगलेच आहेत. रामरावाने प्रामाणिकपणाने वडिलांच्या कर्जाची फेड केली. आपल्या आईचं सांगणं मान्य केलं. जे त्याचं कर्तव्य होतं ते त्याने आनंदाने पार पाडलं.

शामराव खराच शूरासारखा वागला. संकटात सापडलेल्या लोकांना मदत करणं हे तरुणांचं कर्तव्यच असतं. ते त्याने मोठ्या उमदेपणाने पार पाडलं.

नामदेवरावांनी एका ग्रामकंटकाला वेळी सावध करून त्याचा जीव वाचवला आणि कशाचीही अपेक्षा न करता, त्यांनी आपली वाटचाल सुरू केली. त्यांच्या अंत:करणात देवपणा सामावलेला आहे. त्यामुळेच, गावाला शत्रूसारखा वाटणाऱ्या माणसाचाही जीव वाचला पाहिजे. अशी बुद्धी त्यांना झाली. आम्हाला वाटतं की आमच्या सोनाराणीला हा नामदेवराव अगदी योग्य असा वर आहे. घरच्या मंडळींचेही असेच मत दिसते. काय मुरारी, राधा तुम्हाला पटतं का आमचं हे म्हणणं? आणि सोना राणी, तुला काय वाटतंय गऽ' असं विचारून त्यांनी आतल्या दाराकडे पाहिलं.

सोना भारावल्यासारखी टक लावून नामदेवाकडे पाहाते आहे, असं त्यांना दिसलं.

चांगलासा मुहूर्त पाहून मुरारी आणि राधाच्या त्या कन्यारत्नाने 'सुवर्णा' होऊन नामदेवाच्या घरी प्रवेश केला. सनईचौघडा वाजला. गावजेवण झाले. वधूवरांना थोरांचे आशीर्वाद मिळाले. अशी आहे एका लग्नाची सोन्यासारखी गोष्ट!

# मामाच्या गावाला जाऊ या

माझा एक नातू विनीत नुकताच त्याच्या मामाच्या गावाला जाऊन आला. मात्र तो आगीन्‌गाडीत बसून तिथे गेला नाही, तर विमानाने गेला. त्याचा मामा अमेरिकेतच स्थायिक झाला आहे. म्हणून त्याने आपल्या वहिणीला म्हणजे सौ. नीता जोगळेकर हिला विनीतला बरोबर घेऊन त्याच्याकडे येण्याचं आमंत्रण केलं. त्याप्रमाणे गेल्या मे महिन्यात विनीत आपल्या आईबरोबर अमेरिकेला जाऊन आला. विनीतला इतक्या लहान वयात परदेश पहायला मिळतो आहे, त्याच्या त्या परदेश वारीमध्ये त्याने काय पाहिले, काय अनुभवलं आणि त्याच्या मनावर त्याचे कोणते ठसे उमटले असतील, याबद्दल मी नेहमी कल्पना करीत रहायची. मला असं वाटलं की आपण जर विनीतची मुलाखत घेतली आणि ती त्याच्या वयाच्या वाचकांच्या हाती दिली तर किती चांगलं होईल.

विनीत हा हुषार आणि शिस्तप्रिय मुलगा आहे. आदर्श विद्यार्थ्यासाठी ठेवलेलं बक्षीस त्याला मागल्या वर्षी त्याच्या शाळेकडून मिळालेलं आहे. अशा या विनीत जोगळेकरची ही मुलाखत.

मी- विनीत, तुला सध्या अकरावं वर्ष चालू आहे. तू महाराष्ट्र मंडळाच्या मराठी माध्यमाच्या शाळेत पाचवीमध्ये शिकतो आहेस. आता मला असं सांग की, तुला आईबरोबर

अमेरिकेला मामाकडे जायला मिळणार आहे, हे कळल्यावर तुला काय वाटलं? आणि शाळेतल्या तुझ्या दोस्तांना?

विनीत- मला ना, खूप म्हणजे खूपच आनंद झाला. मागल्या वर्षी माझी आजी तिकडे जाऊन आली. तिने किती गंमती जमती सांगितल्या आम्हाला आणि विमानात बसायच्या कल्पनेने तर मी अगदी आभाळापर्यंत उड्या मारत होतो. माझ्या दोस्तांचं म्हणाल तर ते माझी खूप चेष्टा करायचे. 'लकी आहेस हं तू! असं म्हणायचे, जाड्या होऊन परत येशील रे! असंही चिडवायचे ते. म्हणजे तुम्हाला माहीतच आहे गारगार पेयं, अगदी हवी तेव्हढी वरं का. अन् आईसक्रीम आणि केक, पेस्ट्रीज, चॉकलेटं- चैनच चैन.

मी- वा वा ही यादी ऐकून माझ्या सुद्धा तोंडाला पाणी सुटलं वरं का. मग काय- विमानातून जाताना-

विनीत- अहो. काय मजा वाटली. विमान उंचावर गेलं ना, तेव्हा सगळीकडे ढगच ढग दिसले आणि केव्हा केव्हा खालचं दिसलं, तर अगदी लहान लहान खेळण्यासारखी दिसली ती घरं बिरं! आम्ही रॅलेला पोचलो. तेव्हा दोघं मामा दिसले आणि खूप आनंद झाला.

रस्त्याने जाताना सुद्धा फार गंमत वाटली. ताशी पासष्ट मैल वेगाने जायचं म्हणजे काय! मोटरचे व्हील डावीकडे असतं आणि माणसं, वाहनं उजवीकडून जातात. जंगलं तर इतकी आहेत तिथे. घरांच्या मागं जंगलंच

वाचनालय
२९६८ ३१/३/९२
बा. वा.

दिसतात. छान वाटतं ती पहाताना. वॉशिंग्टनला व्हाईट हाऊस- ते बाहेरूनच पाहिलं. लिंकन मेमोरियल पाहलं. लिंकनबद्दल आईने मला खूप माहिती सांगितली होती वॉशिंग्टनची घरं मोठाली आहेत.

मी- छान. तू खूपच चांगली माहिती दिलीस हं. काय रे तुम्ही आपल्या काही नातेवाईकांकडे पण गेला होता ना?

विनीत - गेलो होतो तर. पण आमची अमेरिकन मामी आहे ना, तिला आपण भारतातली माणसं इतक्या नातेवाईकांकडे जातो-येतो, या गोष्टीचं आश्चर्य वाटतं. आईचे एक काका न्यू जर्सीला रहातात. त्यांचा मुलगा आनंद मराठे माझ्याशी खूप मोकळेपणाने वागला.

त्याच्या शाळेत सुद्धा आम्हाला घेऊन गेला. शाळा खूप सुंदर होती. तिथे वर्गात मुलं दाटीदाटीने बसत नाहीत. तास संपले की हव्या त्या छंदवर्गात जाऊन काही काही करत असतात. आम्ही नायगारा फॉल पण पाहिला. ‘मेड ऑफ दि मिस्ट’ नावाच्या बोटीतून आम्ही धबधब्याचा चक्क पोटात जाऊन गंमत पाहून आलो. धुकंच धुकं आणि धबधब्याचा प्रचंड आवाज. काय मस्त आहे हो नायगारा!

मी- विनीत, असाच तुझ्या आईने माझ्या हातात तुझा एक फोटो दिला. मिकी माऊसबरोवर कुठे भटकायला गेला होतास तू?

विनीत- अहो, कुठे म्हणजे काय विचारता? फ्लॉरिडाला! आम्ही डिस्नेवर्ल्ड बघायला नव्हतो का गेलो? तिथला फोटो आहे तो. डिस्नेवर्ल्डबद्दल सांगायचं झालं तर मला खूप खूप बोलावं लागेल. वेळ आहे ना तेव्हढा तुम्हाला?

मी- आहे तर. आज त्यासाठी तर मी तुमच्याकडे आले आहे. बोल, कसं आहे ते डिस्नेवर्ल्ड?

विनीत : अगदी वंडरफूल आहे. अजून त्याचीच स्वप्नं पडतात मला. तिथे एक मॅजिक किंग्डम् आहे. ते मुलांसाठी आहे. तिथे आपण गेलो की, आश्चर्यांचे एकामागून एक धक्के बसतात आपल्याला. भुतांचा महाल पहाताना क्षणभर भीतीने आपला थरकाप होतो. तिथल्या आगगाडीची मजा सांगतो. ती किनई तिरकी तिरकी फिरते. आपली आपण सुरू होते आणि तशीच थांबते पण. तिची कळ हलवणारा माणूस दूर बसलेला असतो, हे मला नंतर कळलं. वॉल्ट डिस्नेच्या सिनेमात असतात ना ते प्राणी आपल्याला तिथे भेटतात. वेष घातलेली माणसंच असतात ती. डिस्ने वर्ल्डमध्ये जंगलक्रूझने जायला मिळतं. त्या वेळी यांत्रिक हत्ती आपल्या अंगावर पाणी उडवतात. फटाक्याच्या बंदुकींनी प्राण्यांना खोटं खोटं मारता येतं. पण आजी, याहून गंमत वाटते ती स्पेस माऊंटनच्या वेळी. आपण आत बसून बेल्ट बांधायचा. दांड्याला

धरायचं. अंधारामध्ये ते विमान भरवेगाने वरखाली जातं. तिथे आपल्याला ग्रह दिसतात. शनी, मंगळ, व्हीनस असे ग्रह एकदम आपल्या अंगावर आल्यासारखे वाटतात. चाचे माहीत आहेत ना तुम्हाला? तर ते चाचे आपल्यावर हल्ला करतात. आपल्याला बोटीत बसवून नेतात. कधी आपण धुप्पकन खाली पडतोय असं वाटतं. माणसांना जेलमध्ये बंद केलेलं असतं आणि त्या पिंजऱ्याची किल्ली एका कुत्र्याजवळ असते. हे सगळं बनावट असतं बरं का. पण एकेकदा अशी भीती वाटते! या डिस्नेवर्ल्डमध्ये सुंदर सुंदर देखावे पण आहेत. गाणं, लाईटींगची मजा आहे. असं हे प्रकरण भारीच आवडलं बुवा आपल्याला.

मी- मला सुद्धा आवडलं बरं का हे डिस्नेवर्ल्ड प्रकरण. पण आता थोडं दुसऱ्या गोष्टींबद्दल बोलूया. तुला खूप शिकायचं आहे ना? कोण व्हायचं तुला?

विनीत- मला डॉक्टर व्हायचंय. मी अभ्यासदेखील मन लावून करतो. डॉक्टर झाल्यावर मी अमेरिकेला जाऊन जास्त शिकून येईन.

मी- म्हणजे परत भारतात येशील, असंच ना? मला तुझा हा विचार फार आवडला. अरे, आपल्या भारतात चांगले डॉक्टर असायलाच हवेत. गरिबांना योग्य ते उपचार मिळावेत. आपल्याला आपल्या नातेवाईक मंडळींच्या

वरोवर प्रेमाने रहाता यायला हवे- हे पटतं ना तुला? छान आहेत तुझे हे मनोरथ!

ही मुलाखत आता संपवायला हवी. आईने पण हे बघ, चहा आणि फराळाचं आणलंय. लाडू आणलाय आणि केक पण आणलाय. या दोन्ही प्रकारांनी बशा कशा शोभून दिसताहेत ते बघ. चल तर आईला बोलाव, आजींना पण बोलाव. आपण सगळ्यांनी मिळून चहा घ्यायचा. फराळ करायचा आणि मग 'थँक्यू विनीत' असं म्हणून मी घरी जायचं.

विनीत- हो. पण त्याआधी मला एकदा तुम्हाला नमस्कार करू द्या.

मी- आयुष्मान भव!

# पोपट पाहुणा

प्रजासत्ताक दिन होता. साऱ्यांना सुट्‌ट्या होत्या, म्हणून मी आराम करीत होते. धावत धावतच जुई खोलीत



आली. 'आजी, अग आजी, चल लवकर, आपल्याकडे पाहुणे आलेत!'

असं म्हणून ती मला जवळजवळ ओढीतच निघाली. 'अग, जरा मला केसांवर फणी तर फिरवू देशील?'

जुई हसली, म्हणाली, 'अगदी आहेस तश्शीच चल.'

मला स्वैपाकघराच्या दारात नेऊन ती म्हणाली, 'ते बघ पाहुणे!' खरोखर माझ्या डोळ्यांवर माझा विश्वासच बसेना. तिथे कपबश्यांच्या कपाटावर एक हिरवागार पोपट वसला होता. अगदी शांतपणे इकडे तिकडे पाहात होता. जुई हसायला लागली. 'छान आहे ना हा पाहुणा?' मामीने सकाळी गॅलरीचं दार उघडलं, अणि दूधवाला आला म्हणून ती बाहेरच्या दाराशी आली. परत येऊन पाहाते तो काय ही स्वारी आपली इथे वसलेली. आजी! कुणाचा असेल ग हा पोपट? आपल्याच घरी का आला असेल, वघ वघ कसा धिटुकला आहे! आपण वोलतो आहो ना पण हा मुळीच घावरत नाहीये.

'ए आजी, आपण याला पाळू या का?

जुई प्रश्नांची सरबती करीत होती. त्या पोपटाकडे पाहात मी देखील आश्चर्यात वुडून गेले होते. स्वैपाकघरातल्या साध्यासुध्या वस्तूंमध्ये ते हिरवंगार पाखरू कसं अगदी शोभेच्या वस्तूसारखं खुलून दिसत होतं. मला वाटलं ज्यांच्या घरून हा पळून आला असेल ती माणसं किती चुटपुटत असतील! हा काय खातो, केव्हा खातो, पितो कोण जाणे! आणि मनीमाऊपासून याला कसं वाचवायचं? एक ना दोन- काय करायचं याचं? कल्पनांचा गुंता वाढत

होता. तोच जुईची मामी आत आली. शेंगदाणे, मटारचे दाणे अशा वस्तू तिने जमिनीवर टाकल्या तशी पोपटाची स्वारी भुर्रकन खाली उतरली. पटापटा दाणे खायला लागली. टरफलाच्या आतला भाग खाताना तो पोपट आपला एक पाय उचलून धरी. थोडे खाऊन झाले, नि मग तो जमिनीवर लुटूलुटू चालू लागला. जरा वेळाने घडीच्या खुर्चीच्या दांडीवर चढला. त्याच्या पहिल्या घरच्या पिंजऱ्याची दांडी त्याला आठवत होती का? आणखी काय काय आठवत होते त्याला?

मी म्हणाले 'पोपट पोपट विठ्ठल विठ्ठल!' पोपट गप्पच राहिला. मग त्याने हळच एक शीळ घातली. पुन्हा गप्प राहिला. इकडे तिकडे पाहात त्याने पटकन् खिडकीची चौकट गाठली. आजूबाजूला पाहिलं आणि घरात आला. जुईची मामी भाजी चिरीत होती. तिथे थांबला, लहान मुलासारखा. मामीने ओल्या खोबऱ्याचा एक तुकडा त्याच्या पुढे टाकला, पाहुण्यांना तो फारसा आवडलेला दिसला नाही.

संध्याकाळ होऊन गेली. चौकशी करायला कोणीच आलं नाही. सोसायटीतली मुलं मात्र गोळा झाली. त्यांची गडबड त्याला बरी वाटत असावी. जरा जोरजोराने तो काही अर्थशून्य शब्द बडबडला. रात्री एका हवेशीर बास्केटमध्ये ठेवून जुई आणि मामी झोपायला घेऊन गेल्या. वर एक पातळ फडकं ठेवलं होतं.

सकाळी [illegible] उठून स्वपाकघरात आले. त्या कालच्या जागेवर पोपटराव बसले होते. 'आजी, आजी, मामीने त्याला दुधातून शक्तीचं औषध दिलं. बघ कसा मजेत आहे तो. आहे ना ?

जुई कौतुकाने सांगत होती. तिच्या मामीने आपल्या एका हौशी मैत्रिणीला फोन केला. 'हॅलो, आमच्याकडे एक पोपट आलाय्. पाळीव असावा तो, तुम्हाला हवाय का ?'

'अग ! तो पोपट माझ्या मैत्रिणीचा तर नसेल ? आपला पोपट हरवलाय असं म्हणत होती ती. मी तिला फोन करून कळवते. बरं का.'

वा ! काय पण योगायोग. सविताला सहज म्हणून फोन केला, आणि तिच्या मैत्रिणीचाच हा पोपट असावा ! खरोखर दैव मोठं जादूगार आहे ! मी मनाशी म्हणाले. पोपटाच्या हालचाली बघत राहिले. ते गोंजिरवाणं रूप जणू समूर्त चैतन्य आमच्या घरात निर्धास्त राहिलं होतं. बटनासारख्या आपल्या डोळ्यांनी आसपासचं जग निरखत होतं ! मी सुनेला म्हणाले, 'सविताची मैत्रीण त्याला घेऊन जायला आली की मला सांग बरं का. त्यांची भावभेट मला पाहायची आहे.'

प्रजासत्ताक दिनाची सार्‍यांनाच सुट्टी होती. साडेनऊच्या सुमाराला आपल्या मुलीला घेऊन अपर्णा आली. तिने एक छोटेखानी टॉवेल बरोबर आणला होता. अधीर पावलांनी

आत येत ती म्हणाली, ‘कुठे आहे विठू? विठू, ए, विठू... ?’ सूनबाईने तिला ओटघाजवळ नेले. त्याच्या आवडत्या शेल्फावर एका हिरव्या प्लेटवर तो हिरवा पाहुणा वसला होता. अपर्णा जवळ गेली. ‘विठू, ए, विठू घरी जायचं ना आपल्याला?’ असं म्हणत ती आम्हाला म्हणाली, ‘गणपतीच्या दिवसांत एक दिवशी हा उडाला. आमच्या सासूबाई दिवसभर वेचैन होत्या. डोळे पुसत होत्या. का हो? हा बोलत होता ना? रसिका रसिका! म्हणत होता ना? अनावर वात्सल्याने ती वोलत होती. मग जवळ जाऊन तिने विठूला त्या टॉवेलमध्ये लपेटले आणि ‘येते हं’ म्हणत ती निघाली, तोच विठू तिच्या हातातून सुटला आणि भुर्रकन उडून कपाटावर चढून वसला. अपर्णाचा थोडा विरस झाला. पण मग आमच्याकडच्या एका बास्केटमध्ये त्याला, नीट ठेवून तिने त्यावर टॉवेल ठेवला.

निघताना ती म्हणाली, ‘माफ करा हं, पण आता घरी जाऊन एकदा तो आपल्या पिंजऱ्यात गेला, की मग भानावर येईल. बावरून गेला असेल विचारा! मुलांबरोबर गरम गरम वरणभात खाईल. तेव्हा खुलेल त्याची कळी,’ असं म्हणून अपर्णा मुलीला पुढे करून बाहेर पडली.

मला वाटलं आज प्रजासत्ताकदिन, स्वातंत्र्यदिन, पण अपर्णाच्या मताने, हा एकदा त्याच्या पिंजऱ्यात जाऊन पोचला म्हणजे सुखी होईल! यांतल्या विरोधाने माझ्या मनात एक सूक्ष्म कळ येऊन गेली. दिवस सुटीचा आणि

आनंदाचा होता. मला मात्र मधून मधून ते पोपटाचं रूप आठवत होतं. देवाघरचं ते लाघव आमच्या घरात एक दिवस का होईना, खेळून बागडून गेलं, असं वाटत होतं. जुई म्हणत होती, 'आपण त्या अपर्णा मावशींच्या घरी जाऊ. विठू परत मिळालामुळे त्या घरातली सगळी मंडळी किती आनंदात असतील! आजींनी तर देवापुढे खडीसाखर ठेवली असेल. रसिका आणि आनंद तर त्याच्या भोवती भोवती फिरत असतील. गरम गरम वरण भात त्याच्या सोबतीनं खात असतील. हो ना आजी?' जुई जणू काही माझ्या मनातलंच बोलत होती.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी अपर्णा आमच्याकडे आली. तिचा चेहरा उतरलेला दिसत होता. मी तिला विचारलं, 'बरं नाही का तुला? बास्केट सावकाश दिली असतीस तरी चाललं असतं. पण अगोदर सांग विठू काय म्हणतोय? रमला आहे ना लगेच?' अपर्णा क्षणभर थांबली, मग म्हणाली, 'खरं सांगू का आजी, तो पोपट आमचा नव्हताच मुळी!' 'म्हणजे म्हणूनच का तो त्या दिवशी तुझ्या हातातून निसटायला पहात होता? तर मग त्याचं पुढे काय झालं?' अपर्णा म्हणाली, 'सांगते, मी तुमच्याकडून जात होते ना त्याला घेऊन तेवढ्यात समोरच्या वाडीमधील दोन मुलं धावतच माझ्याजवळ आली. गयावया करीत मला म्हणाली. 'काकू तो पोपट आमचा आहे. काल सकाळी पळाला होता. देऊन टाका आमचा आम्हाला.' असं म्हणत

त्यांनी एक शीळ घातली. तसा फडफड करीत पोपट बॉस्केटमधून निघाला आणि तो त्यातल्या एका मुलाच्या खांद्यावर जाऊन बसला. 'जाऊ दे ज्याची वस्तू त्याला पोहोचली. तू काही वाईट वाटून घेऊ नकोस.' मी अपर्णाची ममजूत घालायला लागले. तशी ती म्हणाली, 'पुढचं तर ऐकून घ्या. त्या मुलांनी पोपटाला घरी नेलं. त्यांचा चुलता तिथेच होता. तो म्हणाला की, पोपटाचे पंख कापायला हवेत म्हणजे मग तो असा पळून जायचा नाही.' चुलत्याने कात्री आणली. पोपटाला हातात धरलं. देवानेच त्या पोपटाला बुद्धी दिली. मोठ्या शर्तीने तो त्यांच्या हातातनं निसटला. आणि उंच उडून गेला. अपर्णा बोलायची थांबली. पोपट आपला नव्हता हे दुःख आता ती विसरली होती. आम्ही साऱ्यांनी तिला कुंकू लावून निरोप दिला. बाहेर अंधार पडला होता. पण माझ्या डोळ्यांपुढे मात्र स्वातंत्र्याच्या आशेने अज्ञात आकाशाकडे धाव घेणारा तो भाग्यवान पोपट स्पष्ट दिसत होता.

प्रजासत्ताक दिनाची अशा रीतीने सांगता झाली, एक प्रकारचं समाधान मनाला जाणवत होतं!

# प्रेमाची जादू

शमाला शाळेला जायला उशीर झाला होता. तिने दप्तर उचललं आणि ती पळतच बाहेर पडली. वाटेतल्या गटाराच्या झाकणाला अडकून ती तोंडघशी पडली, पण तेवढ्यामध्ये तिच्या लक्षात आलं की, जमिनीच्या खाली कसले तरी ठोकाठोकीचे आवाज निघत होते. ती काहीवेळ तशीच पालथी पडून ते आवाज ऐकत राहिली. इतक्यात काय झालं, पलीकडे जमिनीला एक मोठी भेग पडली. एक हात त्यातून बाहेर आला आणि बघताबघता त्या हाताने शमाला आपल्याकडे ओढून घेतले. 'आई ग! असं शमा किंचाळली आणि बेशुद्धच झाली.

शमाने डोळे उघडून आजूबाजूला पाहिलं. सगळीकडे एक वेगळाच निळसर उजेड पडला होता. भिंती आणि जमीन तशीच निळ्या रंगाची होती. मध्यभागी एका सिंहासनावर एक मनुष्य बसला होता. त्याने जरीचा अंगरखा घातला होता आणि डोक्यावर एक उंच टोपी घातली होती. शमा उठून बसली. तिने आपले दप्तर उचललं आणि ती म्हणाली, 'मला शाळेत जायचंय्. उशीर झाला तर बाई शिक्षा करतील हो मला!' त्यावर मोठ्यानं हसत तो म्हणाला, 'हे बघ मुली, आता तू इथेच राहणार आहेस. हेच तुझं घर आणि हीच तुझी शाळा.' शमा

ऐकतच राहिली. 'असलं कसलं हे घर. आणि हा कोण आलाय् मला इथेच राहा म्हणणारा!' असं पुटपुटत तिने आपलं दप्तर उचललं आणि दार कोठे आहे, ते ती शोधायला लागली. त्या माणसाने टाळी वाजवली त्यावरोवर एक किडकिडीत माणूस कुठूनसा आला आणि सलाम करून म्हणाला, 'काय आज्ञा आहे महाराज?

'ही मुलगी आजपासून तुझी छोटी मालकीण झाली आहे. तिला आतल्या दालनात घेऊन जा. खायला, प्यायला दे अणि तिला शोभेल असा झगा घालून आमच्यापुढे घेऊन ये.' भुत्याने त्याला 'आज्ञा, महाराज' म्हणून सलाम केला. शमाकडे वळून तो म्हणाला, 'चला ताईसाहेब.' पण शमा होती तिथेच उभी राहिली. ती रागाने कापत होती. 'मी कुठ्ठेदेखील येणार नाही. मला अभ्यास करायचाय्.' असं म्हणून तिने दप्तरातून एक चित्रांचं पुस्तक बाहेर काढलं. तो जादूगार- होय, तो जादूगार वंडाच होता. कौतुकाने उठून तिच्याजवळ आला. म्हणाला, 'आम्हाला बघू द्या ना तुमच्या पुस्तकांतली चित्रं. हे काय आहे सांगा पाहू'? शमाला गंमतच वाटली. 'तुम्हाला हेदेखील कळत नाही? ही गाय आहे. ती दूध देते.' वंडाला गाय फार आवडली. 'आता एक गंमत पाहा हं-' असं म्हणून त्याने कसला तरी मंत्र म्हटला आणि काय चमत्कार-ते सगळं चित्रच त्यांच्यापुढे खरंखुरं होऊन उभं राहिलं. ती

गाय, तिथले कुरण, पलीकडे डोंगर आणि काय त्याच्या पायथ्याशी एक निळ्याशार पाण्याचं तळं. ते पाहून शमा अगदी वेडावून गेली. हळूहळू तिची कळी खुलली. गायीला कुरवाळीत तिने एका पेल्यात गाईचं दूध काढलं. तो पेला हातात घेऊन ती बंडाला म्हणाली, 'हं, हे घ्या दूध पिऊन बघा. छान लागतं बरं का दूध.' बंडाला त्या प्रेमळ मुलीचं फार कौतुक वाटलं. 'शहाणी माझी बाई ती! हे बघ मी दूध पितोय. तू मात्र इथे आनंदात राहा. भुत्याबरोबर खेळ, अभ्यास कर.' असं म्हणून त्याने टाळी वाजवताच भुत्या आला. शमा त्याच्याबरोबर आतल्या दालनात गेली. तो गायीचा देखावा परत पुस्तकात जाऊन बसला.

रात्र झाली असावी बहुधा. सगळीकडे सामसूम झाली होती. शमा भुत्याला म्हणाली, 'तू इथे किती दिवस नोकरी करतो आहेस, भुत्याकाका'? 'दिवस? अग वर्ष म्हण वर्ष. शंभर वर्षे झाली मला इथे येऊन. बंडाने मला तुझ्यासारखंच रस्त्यातून पकडून खाली आणलं होतं.' 'होय ना मग मला मदत कर. आपण दोघे पळून जाऊ या इथून! शमा कुजबुजली, पण पलीकडून तिला जोराने बोललेले शब्द ऐकू आले. 'ए पोरी, पळून जायचा बेत करतेस काय? थांब, तुम्हा दोघांचे पायच मी दगडाचे करून टाकतो. अरेच्च्या हे काय, सगळीकडे अंधार कसा

झाला? आणि माझ्या हातातलं जादूचं पुस्तक कुठे गेलं? भुत्या ए भुत्या.' या वंडाच्या आरडाओरडीतच भुत्या चटकन शमाच्या जवळ आला. आपल्या हातातल्या चकमकीने त्याने थोडासा उजेड पाडला आणि पळवून आणलेल्या त्या जादूच्या पुस्तकातल्या एका पानावर बोट ठेवून तो म्हणाला, 'हे वाच. मोठ्याने वाच, लवकर. -' शमा त्यातलं एकेक अक्षर वाचू लागली आणि तिकडून वंडाची आरडाओरड बंद बंद होत गेली. वंडाचं सगळंच अंग दगडाचं होऊन गेलं होतं.

भुत्याने दुसरं पान उघडलं. म्हणाला, आता हे पान पाहा. या गुहेतून बाहेर पडायचा मंत्र आहे त्यात. वाच लवकर.' पण शमाने मंत्र वाचला नाही. ती म्हणाली, 'वंडा आजोबांना इथे कायमचं एकटं टाकून जायचं हे मला नाही आवडणार. आपण त्यांनापण घेऊन जाऊ. तू त्यांचे डोळे बांध. हात, पायपण बांधून टाक. मग आपण मंत्र म्हणून त्यांना पहिल्यासारखं करू आणि तिघं मिळून इथून वरच्या घरी जाऊ या. चल, भुत्याकाका ही तुझी मालकीण तुला हुकूम करते आहे.' शमाचा तो अवतार पाहून भुत्या घाबरून गेला. त्याने पटकन् वंडाकडे जाऊन त्याचे डोळे आणि हात घट्ट बांधले. मग शमाने त्या मंत्राच्या मागच्या पानावरचा मजकूर वाचायला सुरुवात केली. भुत्यानं तिला हाक मारली, 'मालकीण,

लवकर या, यांच्याशी बोला.' शमा धावत गेली. तिने बंडाला म्हटलं, 'बंडा आजोबा, आम्हाला माफ करा, पण आता मी काय म्हणते तेवढं मान्य करा.'

बंडाने तिचा हात हातात घ्यायचा प्रयत्न केला. तो म्हणाला, 'माझे हात सोड बेटी. मी तुला शपथेवर सांगतो की तू म्हणशील तसं मी ऐकेन. आपण जाऊ या वरच्या जगात, पण-पण आम्ही रहायचं कुठे, कायमचं काय-हे तर सांगशील?'

शमा म्हणाली, ते आपण मग ठरवू. आमच्या शाळेत खूप गरिबांची मुलं येतात. त्यांना संभाळा. शाळेजवळच दुसरं घर बांधा. तिथे राहा. मी माझ्या वडिलांना सांगेन. ते तुम्हाला मदत करतील. चला आता मी वर जाण्याचा मंत्र वाचते. भुत्याकाका, भुत्याकाका माझा हात पकडा. आजोबांना धरा. एक-दोन-तीन.

एक विचित्र आवाज झाला आणि त्या गुहेच्या कोपऱ्यातून उजेड आत आला. भुत्याने बंडाचे डोळे आणि हात सोडले होते. तिघेजण कोपऱ्यातल्या वाटेने वर चढले. 'बंडा आजोबा, तुमचा जरीचा झगा आता काढून टाका. आमची मुलं घाबरून जातील तुम्हाला पाहून!' शमा कुजबुजली. वरच्या जगामध्ये सकाळ झालेली होती. सगळीकडे कोवळं उन्ह पसरलेलं होतं. बंडा, भुत्या आणि शमा घराकडे निघाले. शमाचे बाबा दारात उभे होते. त्यांच्या

जिवाला केवढी काळजी लागली होती. त्यांची लाडकी शमा कालपासून कुठेतरी हरवली होती, नाहीशी झाली होती. खूप शोधलं, पण तिचा थांगपत्ता कुणालाच लागत नव्हता. ती शमा-त्यांची लाडकी शमा वेटी समोरून धावत येत होती. तिच्यामागून एक जाडजूड आणि एक काटकुळा माणूस-असे दोघेजण येत होते.

'शमाची आई, शमा आलीय्. ऐकलंस ना-शमा आलीय् आपली-' असं म्हणत वावांनी आपल्या लाडक्या मुलीला उचलून घेतले. वंडा आणि भुत्या या दोघांच्याही डोळ्यांतून आसवं येत होती. शमाची आई वाहेर आली. मुलीला सुखरूप पाहिलं आणि तिच्या रडवेल्या चेहऱ्यावर हसू पसरलं. जरा वेळाने शमाने आपल्या दोघा सोवत्यांना घरात वोलावलं. सर्वांशी त्यांची ओळख करून दिली. आपल्या सोवत्यांजवळ खूप पैसा आहे नि त्यांना खूप समाजसेवा करायची आहे, असंही तिने सांगून टाकलं.

'वावा आणि आई, तुमच्या या हुषार मुलीने आम्हाला अगदी वेड लावून टाकलं. खरोखर देवाची कृपा म्हणूनच तुमची आमची गाठ पडली. यापुढे जादूगार वंडा आणि त्याचा नोकर भुत्या तुमच्या मर्जीप्रमाणे इथे राहून कार्य करतील.' वंडा हे वोलला आणि सर्वजण आश्चर्यचकित झाले. 'जादूगार वंडा? सगळ्या जगभर ज्याचं नाव आदराने घेतलं जातं तो हा जादूगार? आणि त्याला आपल्या

या मुलीनं वेडं केलं? हा प्रेमाचा महिमा आहे! शमा बेटी, तुझ्या प्रेमळ आणि शहाण्या स्वभावामुळे तू ही जादू करू शकलीस! चला सर्वजण आधी घरात चला. असं म्हणून शमाच्या आईने जेवणघरात जाऊन चहा, फराळाची तयारी सुरू केली.

# मी संजू बोलतेय !

ही कहाणी आहे 'लिव्हर-ट्रान्सप्लान्ट'ची. जिच्यावर ही शस्तक्रिया केली गेली, तिच्याच तोंडून ही कहाणी वाचकांना ऐकवत आहो. या मुलीने दाखवलेला शहाणपणा, धैर्य, प्रेमळपणा आणि कृतज़ता यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. तिच्याइतकाच यशाचा वाटा अमेरिकेतील तज्ज़ डॉक्टरांच्या आस्थेवाईकपणाला, पोलिसांच्या कार्यतत्परतेला आणि गोवंडे कुटुंबियांची प्रेमळ पाठराखण करणाऱ्या अनेकानेक आप्तेष्टांना द्यायला पाहिजे. संजूला मिळालेले संजीवन हे या सर्वांच्या सहकार्याला आलेले सुंदर फळ आहे.

मी संजू - म्हणजेच, कुमारी संजीवनी श्रीराम गोवंडे. माझं वय सध्या पूर्ण दहा वर्षांचं आहे. आम्ही अमेरिकेमध्ये न्यू जर्सी इथे राहतो. मी शाळेत जाते. शाळा मला फार आवडते. तिथले शिक्षक, तिथली मुलं माझ्यावर खूप प्रेम करतात. घरी लहान अशी मी एकटीच आहे. घरचे माझे फ्रेंड म्हणजे माझे डॅडी आणि फास्ट फ्रेंड म्हणजे माझी आई-पुष्पा गोवंडे. तुम्हाला कल्पना येणार नाही इतकी माझी आई गोड आहे, प्रेमळ आहे. कष्टाळू तर अशी आहे की काय सांगू! तुम्ही विचाराल -अगं मुली, ही तर कोणत्याही सुसंस्कृत घरातली परिचित कहाणी

आहे. यात तू आम्हाला विशेष असं काय सांगितलंस? नवलाचं असं काही सांगणार आहेस का?

आहे ना. विशेष असंच काहीतरी आमच्या घरी घडून गेलं आहे. सध्यासुद्धा घडतं आहे. त्याबद्दलच मी तुमच्याशी वोलणार आहे. मला सांगा -'लिव्हर ट्रान्सप्लान्ट' हा शब्द तुम्ही ऐकला आहे का? अगदी मोजक्या लोकांनी तो ऐकला आहे. कारण परदेशात सुद्धा 'लिव्हर ट्रान्सप्लान्ट'चे प्रयोग कमी प्रमाणात झालेले आहेत. अलीकडे मात्र हे जास्त यशस्वी होत आहेत. तुम्हाला समजलंच असेल की मी - संजू अशीच एक पेशंट आहे. ८७ च्या एप्रिलच्या १ तारखेस शिकॅगो येथे माझी जुनी मूळचीच खराव लिव्हर काढून तिथल्या हुषार डॉक्टरांनी माझ्या शरीरात माझ्या लिव्हरशी जुळणारी एक नवी चांगली लिव्हर ट्रॉन्सप्लान्ट केली म्हणजेच संजीवनीलाच संजीवन मिळालं! (हे शब्द माझ्या आशामावशी दातेचे आहेत वरं का!)

माझ्यावर केलेल्या या कुशल शस्त्रक्रियेबद्दल मी तुम्हाला सारं काही सांगणारच आहे. पण माझी जन्मापासूनची केस हिस्टरी (हकीकत) तुम्हाला सांगते.-

माझे डॅडी-श्रीराम गोवंडे आणि आई पुष्पा काणे यांचे १९६८ मध्ये लग्न होऊन ते अमेरिकेला गेले. एक-दोन वर्षातच त्यांना एक वाळ झालं. त्यांनी तिचं नाव 'गौरी' ठेवलं. त्या वाळाची तब्येत बरोबर नव्हती. एक महिन्याने

४५ २९६८ 39B.१४

हे लक्षात आलं की, तिची लिव्हर उपजतच सदोष होती. तिला दूध, अन्न, पाणी काही पचत नसे. अंग पिवळे, अंगाळा एकसारखी खाज, चिडणे-रडणे-तळमळणे असं चालायचं. अमेरिकेत आणि भारतात तिच्यावर खूप उपचार केले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही आणि दोन-अडीच वर्षांनी माझी गौरीताई न्यूमोनियाचं निमित्त होऊन देवाघरी गेली. आजी-आजोबा, आई-डॅडी या सगळ्यांना किती वरं दु:ख झालं असेल! हळूहळू त्यांचे दु:ख कमी झालं. नेहमीच्या कामात दोघेही वुडून गेली. डॅडींना ऑफिसचं काम आणि आईला तिचा घरसंसार. परदेशात त्यांना खूप चांगले मित्र-मैत्रिणी मिळाल्या. मला माहीत आहे ना त्या सगळ्यांचा प्रेमळपणा आणि चांगुलपणा!

८ डिसेंबर १९७६ ला आईला दुसरं बाळ झालं. ते बाळ म्हणजेच मी -संजू. सगळ्यांना आनंदच आनंद झाला असणार! एक-दोन तासांतच आईच्या लक्षात आलं की या नव्या बाळाचंही अंग पिवळं दिसत आहे! तिच्या छातीत धडकीच भरली असेल. घावरून तिने डॉक्टरांना विचारले असेल, 'माझं बाळ नॉर्मल असेल ना हो?

तिचं हे बाळही नॉर्मल नव्हतं. त्याची देखील लिव्हर सदोष होती. बाराव्या दिवशी बाळाचे ऑपरेशन करून पोट, लिव्हर वगैरेच्या तपासण्या केल्या. वरकरणी काही दोष आढळला नाही. पण परिस्थिती गौरीताईच्या वेळचीच

होती. अन्न पचायचे नाही, अंग खाजायचे, पिवळे डोळे, काळपट रंग, सू, शी सगळे मळकट, पोट मोठे, हात-पाय बारीक, किरकिरणं, रडणं, रात्र-रात्र घरच्यांना जागवणं हे सगळं पहिल्या मुलीच्या वेळी झालं तसंच माझ्या बाबतीतही होऊ लागलं म्हणे. मग आई-डॅडींच्या डॉक्टरांकडे तशाच खेपा सुरू झाल्या. इंजेक्शनं, औषधं पथ्यपाणी एक ना दोन. माझं वय वाढत होतं. पण आजार कायम होता. माझी काळजी लागलेली असायची. माणसं मला पाहून काहीतरी कुजबुजायची. मला ते अगदी आवडत नसे. आई लोकांशी माझ्याबद्दल बोलते, असं कळलं की मी त्रागा करायची. आई लोकांच्यात नुसतं हसली, खेळली, रमली तरी मला आवडायचं नाही. मला कळायला लागलं तेव्हा आरशातलं माझं ध्यान पाहून मला वाईट वाटे. काळवंडलेलं, चिडकं, रडकं असं ते माझे रूप! त्यामानाने आजूबाजूची मुलं किती गोड, सुंदर वाटायची. मी आईला अधिक बिलगायची. माझी आई किती गोड, सुरेख आहे. प्रेमळ तरी किती! तसेच माझे डॅडी. ते दोघे मला कौतुकाने खांद्यावर घेऊन हिंडत फिरत. झोपताना देखील कधी-कधी मी हट्ट केला, तर आई मला जवळ घेऊन गाणे म्हणायची. माझ्याशी हलके-हलके बोलायची, 'संजू इज ए गुड गर्ल. संजू माय स्वीट, माय डार्लींग! संजू किनई आता औषध घेणार आहे. आणि मग स्लीप बेबी स्लीप!'... आई कधी प्रार्थना म्हणायची. कधी

कधी तिनेच केलेली कविता म्हणायची. मला चौथं वर्ष लागलं. तब्येत खराब व्हायची. मग अमेरिकेत नाहीतर भारतात मला कसली ना कसली ट्रिटमेंट चालू व्हायची. आम्ही अमेरिकेत वेगवेगळ्या गावांत राहिलो, तिथले डॉक्टर माझी खूप काळजी घेत असत. या दिवसांत आई मला गोष्ट सांगायची. कधी-कधी वाचून दाखवायची. शाळेत जाण्यासाठी घरी जे शिकवावं लागतं ते आई मला न रागवता, न कंटाळता शिकवायची. मला गोष्टी ऐकायला आवडायच्या. गोष्टीतील मुलं कशी हसरी, खेळकर आणि प्रेमळ असतात. ती दुसऱ्यांना हवीहवीशी वाटतात. शूर, साहसी मुलांचे तर विचारूच नका. मला वाटायचं मी संजूसुद्धा अशी मुलगी हो शकते. ती सगळ्यांना आनंद देऊ शकते! मी एकदा आईला आणि डॅडींना म्हणालेसुद्धा, 'लोक म्हणतात की माझे डॅडी आणि आई फार चांगले आहेत. ते तुम्हाला 'बिच्चारे' असं म्हणतात. मी अशी दुखणेकरी आणि रागीट मुलगी आहे म्हणून ते तुम्हाला 'बिच्चारे' म्हणतात ना? मी देखील आता गुडगर्ल होणार आहे. एखाद्याला त्रास होईल अशी वागणार नाही मी कध्धी!

माझं बोलणं संपायच्या आतच आईने मला जवळ घेऊन माझे पटापटा पापे घेतले. डॅडी म्हणाले, 'संजू बेटी, तू गुडगर्लच आहेस. पण हे खरं की कधी-कधी औषध घेताना, जेवताना आईवर चिडतेस, रागवतेस त्यामुळे

तिला फारफार वाईट वाटत असणार!' आईने एकदा डोळे मोठे करून त्यांच्याकडे पाहिले. ते डोळे पाण्याने डबबलेले दिसत होते.

मी नीट चालू शकत नव्हते. पायांना माझं वजन पेलत नसे. तेवढी ताकदच माझ्यामध्ये नव्हती. तरी आई मला शाळेत घेऊन जायची. शाळा म्हणजे जादूनगरीच असते. मित्र-मैत्रिणींना, टीचर मुलांना काय आवडेल, काय करता येईल याचा विचार करून शिकवतात. खूप-खूप खेळायला, शिकायला मिळतं. आमच्या स्कूलवसच्या नॅन्सीशी तर माझी दोस्तीच जमली. ती अजून कायम आहे. मी जशीजशी आई, डॅडी आणि इतर सर्व लोकांशी गोडीने वागायचा प्रयत्न करायला लागले, तसे तसे इथले आणि भारतातले आमचे नातलग माझं खरं कौतुक करायला लागले. माझी प्रकृतीही बरी रहायला लागली. मी आपण होऊन उठून चालायचा प्रयत्न करू लागले. चालताना मजा यायची. मला मराठी थोडं येतं पण इंग्लिश चांगले बोलता येतं. आई माझे केस विंचरून छान अँरेंज करते. चांगले सोयीचे कपडे मला घालते. पथ्याचे पदार्थ वेळोवेळी करून देते. अलीकडे मी स्वत:सुद्धा या गोष्टी करायला लागले आहे बरं का! असे वाटले की संजूची गाडी कशी छान चालते आहे. पण नाताळचा सण म्हणजे इकडच्या लोकांची आणि आमची सुद्धा दिवाळीच असते. जिकडे-तिकडे उत्साह आणि आनंद उसळत असतो. प्रेमाची

लयलूट असते. १९८६ च्या नाताळात मी सुद्धा म्हटलं तर खूप मौजमजा केली. पण मला थकवा मात्र लवकर यायचा. डोकं कलकलायचं. भूकच नसायची. अंग खाजवायचं. चिडचीड करावीशी वाटायची. आई-डॅडी आणि आणि आमचे नेहमीचे डॉक्टर मदतीला होतेच. जानेवारी महिना आला आणि मला जास्तीच वरं वाटेनासं झालं. माझ्या लिव्हरला आणि स्प्लीनला सूज आली आहे असं निदान झाले. मला ऊठवेना की बसवेना. औषध-पथ्य-तपासण्या-काळजी या सगळ्या गोष्टींनंतर आमच्या डॉ. जॅवीट् यानं सांगितलं की, 'संजूला वाचवायचा एक उपाय आहे. आपण तो करून पहायचा. तो म्हणजे लिव्हर ट्रान्सप्लांट. जुनी खराव लिव्हर काढून दुसरी पेशंटच्या शरीरात वसू शकेल, एकजीव होऊ शकेल, अशी लिव्हर तिथे वसवायची.

डॉक्टरांनी आई-डॅडींना धीर दिला आणि आई-डॅडींनी मला धीर दिला. माझ्या हातात काहीच नव्हतं. रडून-ओरडून दुसऱ्यांना आणखी दुःख द्यायचं का? छट् मी त्या सगळ्यांना सांगितलं, 'तुम्ही जे कराल ना ते चांगलंच असेल.' आईने मला घट्ट छातीशी धरलं आम्ही दोघींनी एकमेकांचे डोळे पुसले. भारतातल्या आमच्या आजोवा-आजींना, मावशी-मामांना, काकांना या ऑपरेशनवद्दल कळवलं. स्टेटस्मधल्या मित्रमंडळींनाही कळवलं. डॉ. जवीट् यांनी शिकागो येथील डॉ. व्हिटिंगटन या प्रसिद्ध सर्जनशी वोलणे

केले. 'संजू अजून अकरा वर्षांची होत आहे. वयात येण्याची वेळ यायच्या आतच तिचं हे ऑपरेशन करून घ्यावे. तिची ढासळणारी प्रकृती पहाता, असे वाटते की शक्य तेवढ्या लवकर तिचे ऑपरेशन व्हायला हवे!' हा असा मजकूर आईने सर्वांना कळवला. ते मी ऐकले होते. मी माझ्या आई-डॅडींसाठी प्रार्थना करायला लागले. पण आमचे असंख्य नातेवाईक यांनी मात्र माझ्यासाठी प्रार्थना करणारी आणि शुभेच्छा देणारी अगणित पत्रं पाठवून आम्हा सगळ्यांवर आपल्या प्रेमाचा जणू पाऊसच पाडला.

शिकागोला गेल्यावर तिथे माझ्या प्रीट्रान्सप्लान्ट टेस्टस् घेतल्या गेल्या. माझी प्रकृती फार नाजूक झालेली पाहून ट्रान्सप्लॅन्टच्या यादीत माझं नाव टॉप प्रायॉरिटीत घातले गेले. आम्ही न्यू जर्सीला घरी परतलो आणि डॉ. व्हिटिंगटन यांच्या नर्सबाईच्या तातडीच्या निरोपाची वाट पाहत राहिलो. त्या मधल्या काळात कर्णिक, फडके, टिळक आणि इतरही मंडळी जोडी-जोडीने येऊन आम्हाला भेटून गेली. मग ३१ मार्चला नर्स शेरील यांचा शिकागोहून फोन आला, 'योग्य अशी लिव्हर मिळण्याची शक्यता आहे. तरी लवकरात लवकर निघा.'

डॅडींनी फ्लाईटची चौकशी केली. त्या दिवशी ५,३० आणि ६.३० अशा दोन फ्लाईटस् होत्या. ५.३० च्या फ्लाईटने जायला हवे होते. नाहीतर ती लिव्हर दुसऱ्या

कोणासाठी तरी वापरणे भाग पडले असते. अमच्या स्कूलवसची चालिका नॅन्सी कॉन्होव्हरने आम्हाला एअरपोर्टवर न्यायचे कबूल केले होते. पण गर्दीच्यावेळी ५.३० ची फ्लाईट गाठणे कसे शक्य होते? डॅडींनी पोलिसांकडे फोन केला. त्यांनी तात्वडतोव मदतीचे आश्वासन दिले आणि कारने आम्हाला न्यू जर्सी टर्न पाईक पर्यंत पोचवले. तिथून पुढे स्टेट पोलिसांनी आम्हाला एअरपोर्टवर न्यायचे असे ठरले होते. मधेच असे कळले की, ५.३० ची फ्लाईट वाईट हवामानामुळे कॅन्सल झाली आहे. पण पोलिसांनी दुसऱ्या एका विमान कंपनीच्या फ्लाईटची माहिती काढली. एवढेच नव्हे, तर आम्हा तिघांसाठी त्यात सीटस्‌ही रिझर्व करून दिली. आम्ही विमानतळावर पोचेपर्यंत विमान थांववावे अशी सूचनाही त्यांना करून पोलिसांनी वेगाने वेळेच्या आत आम्हाला विमानतळावर पोचवले. खरोखर पोलिस ही यंत्रणा कोणत्याही नागरिकांच्या अडचणीच्यावेळी इतकी मदत करू शकली, हे त्यांचे कर्तृत्व अगदी दृष्ट लागण्याजोगे झाले, असे डॅडींनी त्यांना पाठविलेल्या आभाराच्या पत्रात पुन्हापुन्हा म्हटले आहे. आम्ही विमानात वसल्यावर मग आई-डॅडींना माझ्याकडे लक्ष द्यायला सवड मिळाली.

आम्हाला न्यायला शिकागोच्या विमानतळावर हॉस्पिटलतर्फे हेलिकॉप्टर येणार होते. पण मधल्या काही अडचणींमुळे तसे झाले नाही. त्या ऐवजी ॲम्ब्युलन्स आली. अशा रीतीने घरून निघाल्यापासून साडेचार तासांत

आम्ही शिकागोच्या हॉस्पिटलमध्ये पोचलो. शिकागोला गेल्यावर लगेचच मला पहायला डॉक्टरांची एक टीमच तिथे येऊन गेली. तपासणी झाल्यावर त्या सर्वांनी माझे कौतुक केले, अशी स्वस्थचित्त आणि समजूतदार मुलगी त्यांनी पहिल्यांदाच पाहिली म्हणे. आत जाण्याची वेळ आली तेव्हा मी सर्वांना हसून बाय-बाय केले. माझी आई नेहमीच असं करते, तिच्यामुळे मलाही असे हसणे जमायला लागले आहे. आई सांगते की, रात्री १२ च्या सुमारास एक लिव्हर घेऊन हेलिकॉप्टर आले. १.३० च्या सुमारास एक डॉक्टरीण येऊन 'ऑपरेशन चालू झालंय, नवे लिव्हर चांगल्या स्थितीत आहे आणि संजू इज फाईन' असे सांगून गेली. त्यानंतर सुमारे साडेपाच तासांनी डॉ. ब्रोल्श आणि डॉ. इमी यांनी सांगितले की, ऑपरेशन फारच चांगले पार पडले. कसलीही कॉम्प्लिकेशन्स झाली नाहीत. आम्हा दोघांना काय वाटले ते सांगताच येणार नाही. सकाळी ६.३० वाजता आम्ही (द्ध्रुद्य) मध्ये संजूला प्रथम पाहिलं. सर्व बाजूंनी टयूब्जच्या मदतीने यंत्राशी जोडलेली संजू पाहताना एकच क्षण पायाखालची जमीन सरकल्यासारखं वाटलं. पण लगेच 'शी इज डुईंग फाईन' असे डॉक्टरांचे शब्द कानावर आले. मनाला धीर आला. जवळच्या असलेल्या रोनाल्ड मॅक्डोनल्ड हाऊसमध्ये आम्हाला झोपण्याची सोय करून दिली गेली. डोळे केव्हा मिटले हे कळलेच नाही!

मी शुद्धीवर आले तेव्हा आई, डॅडी आणि रैना कर्णिक मावशी हॉस्पिटलमध्ये मला बघायला आले होते. नाकातोंडात ट्यूब्ज होत्या. त्यामुळे मी हातानेच त्यांना 'छान आहे', असे सांगितले. ऑपरेशनच्या तिसऱ्या दिवशी म्हणे काही प्रॉब्लेम आला होता. त्यासाठी पुन्हा ऑपरेशन करून पोट उघडून पाहिले. नव्या लिव्हरचे काम कसे चालले आहे, तेही पाहिले. ४-५-६ व्या दिवसपर्यंत प्रगती ठीक होती. म्हणून मला नेहमीच्या खोलीत आणले. ६ व्या दिवशी पहिली लिव्हर-बायॉप्सी झाली. थोडेसे रिजेक्शन आढळून आले. पण टेस्टचे रिझल्टस् चांगले होते. त्यामुळे तशी काळजी वाटली नाही. भारतातून माझी आवडती आशामावशी आलेली पाहिली तेव्हा फार आनंद झाला. माझं ऑपरेशन व्यवस्थित पार पडल्याची बातमी भारतातल्या माझ्या आजी-आजोबांना आणि सर्वांना समजली तेव्हा साऱ्याच मंडळींना किती समाधान वाटले, हे सांगताना आशामावशी स्वत:च आनंदाने रडायला लागली.

७-८-९-१०-११ या तारखांना हळूहळू सगळ्या ट्यूब्ज निघाल्या. रोज डॉक्टर आणि सर्जनमंडळी येऊन बघून जात. ते सांगत की, 'सो फार, सो गुड' आणि आई-डॅडींना ते पुन्हा पुन्हा सांगत की, 'टेक वन डे ॲट ए टाईम' आई म्हणायची की, त्यांनी दिलेला हा मंत्र ती पुन्हा पुन्हा स्वत:ला म्हणून दाखवायची. १४ व्या दिवशी मी

कळी झाले. नेहमी जे (पथ्याचे) खाणे खात होते, खायची मला परवानगी मिळाली. थोडं थोडं चालायलासुद्धा हरकत नाही, असं डॉ. व्हिटिंगटन यांनी सांगितलं. त्यांच्या नर्स शेरीलने आम्हाला स्वत:च्या गाडीतून शेजारच्या 'हाऊस' वर नेऊन सोडले. तिथे आम्ही दोन आठवडे राहिलो. दर दोन दिवसांनी हॉस्पिटलमध्ये जावे लागे. २१ एप्रिलला दुसरी लिव्हर- वायॉप्सी झाली. रिझल्टस् चांगले निघाले. हायब्लड प्रेशर, पाठ दुखणे आणि गॅसेस यांचा मला जरा त्रास होत होता. आम्ही न्यू जर्सीला परत आलो.

आमचे हे होमकमिंग ग्रेटच् झालं वरं का. घरात प्रवेश करायच्या आधी आशामावशीने आत जाऊन दूध-पाणी आणून माझे पाय धुतल्यासारखे केले. मला ओवाळलं, तोंडात साखर घातली. आणि मग आमची स्वारी घरात आली. डॅडींनी छान-छान फोटो घेतले. आमची मैत्रीण नॅन्सी कॉन्होव्हर हिने सर्वांना आश्चर्याचा छानसा धक्का दिला. तिने घरात पार्टीची झकास तयारी करून ठेवली होती. आनंदाची गोष्ट अशी की आता मला माझं अत्यंत आवडीचं आईस्क्रीम खायची परवानगी मिळालेली होती. अर्थातच मी पार्टीची मस्त मजा लुटली. या नव्या लिव्हरमुळे माझी भूक सुधारली. गोड खायला मिळायला लागलं. माझे पिवळे डोळे कुठेतरी पळून गेले. तिथे तुमच्या सगळ्यांच्या डोळ्यांसारखे डोळे दिसायला लागले. अंगाचा (आणि

सू-शीचासुद्धा) रंग बदलला. आम्हाला न्यू जर्सीमध्ये इतर लोकांनी पण खूप छान-छान भेटवस्तू आणून दिल्या मी संजू - खरं म्हणजे एक साधीसुधी मुलगी पण सर्वांनी मिळून मला अशी वागणूक दिली की, मी म्हणजे जणू काही एक राजकन्याच आहे!

झाली बरं का माझी गोष्ट सांगून. आई म्हणते- संजूची आणि तिच्या संजूची (नव्या लिव्हरची! ही पाचा उत्तराची कहाणी साठा उत्तरी सुफळ संपूर्ण होवो! मला याचा नीटसा अर्थ कळत नाही. पण मला एव्हढं मात्र नक्कीच कळतं, मी जर तुमच्याएवढी मोठी झाले, तर मी देखील जगामधल्या दुःखीकष्टी लोकांची आठवण ठेवीन, त्यांची प्रेमाने सेवा करीन. त्यांच्यासाठी प्रार्थना करीत जाईन! तुम्हीच सर्वांनी ही रीत मला शिकवली आहे ना?

❀ ❀ ❀

म. ग्रं. सं. ठाणे,
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. २९६८ दिनांक 31/3/07
विषय ०११·०१ क्र. ........

BVBK-0402968